# ‘बालकभावा’तील चित्रे (भाग १)

## अनुक्रमणिका


- मनोगत ७
- ‘सूक्ष्म’ या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ८
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील ‘एक विद्वान’ यांनी केलेले भाष्य ९
- आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ १३

१. सौ. उमा यांची साधकांना जाणवलेली आध्यात्मिक गुणवैशिष्ट्ये १४

२. सौ. उमा रविचंद्रन् यांनी बालकभावाची चित्रे काढण्याच्या प्रक्रियेतून त्यांना स्वतःला आणि सनातनच्या अन्य साधिकांना शिकायला मिळालेली सूत्रे अन् आलेल्या अनुभूती १८

३. सौ. उमा रविचंद्रन् यांनी काढलेली व्यष्टी भाव दर्शवणारी चित्रे आणि त्या चित्रांची वैशिष्ट्ये ३२

३ अ. श्रीकृष्णासमवेत केलेल्या दैनंदिन कृती ३२

३ अ १. श्रीकृष्णाने नवजात अर्भकाचे स्वागत करणे ३२

३ अ २. श्रीकृष्णाने साधिकेला दहीभात भरवणे ३५

३ अ ३. श्रीकृष्णाच्या शेल्याला धरून त्याच्या खांद्यावर झोपणे ३६

३ अ ४. श्रीकृष्णाने साधिकेला बालगोपीप्रमाणे सजवणे ३३

३ अ ५. श्रीकृष्णाच्या मांडीवर बसून झोका खेळणे ३७

३ अ ६. यमुना नदीत श्रीकृष्णासमवेत जलक्रीडा करणे ! ४१

३ अ ७. श्रीकृष्णासमवेत नृत्य करणे ४३

३ अ ८. श्रीकृष्णाशी लपंडाव खेळणे ४५

३ अ ९. साधिका रुसल्यावर श्रीकृष्णाने तिची समजूत घालणे ४७

३ आ. साधनेतील कृती / घटना ४७

३ आ १. भगवान श्रीकृष्णाने मुरुगादेवाला दुग्धाभिषेक करणे ४८

३ आ २. भगवंताच्या चरणी केलेल्या चित्ररूप प्रार्थना ! ५०

३ आ ३. मानसपूजा करणे ५२

३ आ ४. प.पू. डॉक्टरांसमोर आत्मनिवेदन करणे ५४
३ आ ५. श्रीकृष्णाच्या चरणी क्षमायाचना करणे ५५
३ आ ६. श्रीकृष्णाचे मर्दन (मालिश) करणे ५७
३ आ ७. वात्सल्यभाव व्यक्त होणाऱ्या कृती ! ५९
३ आ ८. श्रीकृष्ण पहुडला असून त्याचे पाय चेपणे ६२
३ आ ९. श्रीकृष्णाचे चरण घट्ट धरून ठेवणे ६३
३ आ १०. स्वतः श्रीकृष्णासमवेत प.पू. डॉक्टरांची सेवा करणे ६५
३ आ ११. सनातनच्या गोपींची दास्यभक्ती करणे ६९
३ आ १२. साधिकेसाठी श्रीकृष्ण बालकरूपामध्ये येणे ७०
३ आ १३. श्रीकृष्णाने संसार–भवसागरातून सर्वांना पैलतिरावर नेणे ७२
३ आ १४. श्रीकृष्णाने प्रक्रियेच्या शाळेत प्रवेश मिळवून देणे ७४
३ आ १५. पू. सत्यवानदादा यांच्या हस्ते सत्कार झाल्याचे चित्र ७६
३ आ १६. सौ. उमा यांनी साधनेला आरंभ करण्यापूर्वी, साधनेला आरंभ केल्यानंतर त्यांच्या स्थिती दर्शवणारे चित्र ७८

## मनोगत

दैनंदिन जीवनात प्रत्येक क्षणी आपल्याला स्वतःच्या अस्तित्वाची सतत जाणीव असते; कारण ती आपल्या वृत्तीत मुरलेली असते. या जाणिवेच्या अनुषंगानेच आपल्याकडून सर्व गोष्टी घडत असतात वा अनुभवल्या जात असतात. ‘ईश्‍वर किंवा गुरु यांच्या अस्तित्वाची कोणत्याही स्वरूपातील जाणीव उत्कटतेने असणे, त्या जाणिवेच्या पोटी जीवनातील कृत्ये करणे आणि त्या जाणिवेच्या पार्श्‍वभूमीवर जीवन अनुभवणे’, याला ‘ईश्‍वर किंवा गुरु यांच्याप्रती भाव असणे’ किंवा ‘त्यांच्याशी अनुसंधान असणे’, असे म्हणतात.

देवाप्रती ठेवायच्या भावाचे निरनिराळे प्रकार असतात, उदा. यशोदामातेचा वात्सल्यभाव, हनुमानाचा दास्यभाव, अर्जुनाचा सख्यभाव इत्यादी. ‘बालकभाव’ हाही त्यांपैकीच एक प्रकार आहे. यामध्ये साधकाच्या मनात एखाद्या बालकासारखी निरागसता, निर्मळता आणि ‘मी देवाचे लहान मूल आहे. देवच माझी माता, पिता, बंधू, सखा अन् सर्वस्व आहे. तोच माझे रक्षण करणारा आहे’, असा

भाव निर्माण होतो. सनातन संस्थेच्या चेन्नई (तामिळनाडू) येथील साधिका सौ. उमा रविचंद्रन् (उमाक्का) यांच्या मनात श्रीकृष्णाप्रती असाच बालकभाव उत्पन्न झाला. त्या भावस्थितीत ‘मी ३ वर्षांची बालिका आहे’, असे त्यांना वाटू लागले. या भावावस्थेत त्यांनी अनेकविध चित्रे रेखाटली. ही चित्रे पाहून वाचकांना ‘बालकभाव कसा असतो’, हे अनुभवता येईल.

**सौ. उमा रविचंद्रन् ( उमाक्का ) यांची वैशिष्ट्ये**

१. सौ. उमा रविचंद्रन् यांनी चित्रकलेचे शिक्षण घेतले नसतांनाही श्रीकृष्णाची अत्यंत भावमय अशी चित्रे काढली आहेत. साधना वाढू लागल्यावर साधकातील ईश्वराप्रती असलेल्या भावाचे प्रमाणही वाढते. तो भाव ज्या कलेतून उत्कटपणे व्यक्त होऊ शकतो, ती कला देवच त्या साधकामध्ये निर्माण करतो. त्या कलेतून इतरांना आनंद मिळतो आणि त्यांचाही भाव जागृत होतो. साधिका सौ. उमा यांनी काढलेली बालकभावाची चित्रेही अशीच आहेत. बालिका श्रीकृष्णाशी खेळतांना, त्याची पूजा करतांना, त्याच्यासमवेत नृत्य करतांना, यांसारखी कृष्णभक्तीमध्ये रममाण करणारी अनेक मधुर चित्रे या ग्रंथात दिली आहेत.

२. सौ. उमाक्कांनी काढलेली चित्रे हे चित्रांच्या माध्यमातून ‘बालकभाव’ अवर्णनीयरित्या व्हाक्त होण्याचे इतिहासातील एकमेव उदाहरण आहे !

३. भक्तीमार्गात काही जण बालकभावात, तर काही जण गोपीभावात असतात. दिवसभर हे त्याच भावात असतात. सौ. उमा रविचंद्रन् यांचे वैशिष्ट्य हे की, त्या चित्र काढण्यापुरत्या बालकभावात असतात. इतर वेळी मात्र कौटुंबिक आणि धर्मजागृतीचे उत्तरदायित्व सांभाळत असतांना त्या त्या अवस्थेत असतात. त्यामुळे सौ. उमा व्यष्टी आणि समष्टी अशा दोन्ही प्रकारच्या साधना करू शकतात. यामुळेच त्यांची प्रगती जलद होत आहे. - संकलक